# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कोल्हापूर जिल्ह्यात जन-धन योजनेच्या जाचक अटी शिथिल करण्याबाबत**

**(१) २४३५९ (१७-०८-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात जन-धन योजनेच्या जाचक अटीमुळे सर्वसामान्य वर्ग वंचित राहिल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना राज्यातील खेड्यापाड्यातील घटकांपर्यंत पोहोचवण्यात शासकीय यंत्रणेला अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे केंद्र व राज्य शासनाकडून मिळणा-या अनुदानापासून कोल्हापूर जिल्ह्यातील लाखो लोक वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेतील या जाचक अटी शिथिल करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०१६) :**(१) नाही.

जन धन योजनेच्या अटी जाचक नाहीत. जन धन योजनेअंतर्गत बँक खाती उघडताना भारतीय रिझर्व बँकेच्या आपला खातेदार जाणा (KYC Norms)/आपला खातेदार जाणा (Relaxed KYC Norms) आदेशांप्रमाणे बँकांद्वारे आवश्यक तेवढीच कागदपत्रे घेतली जातात.

(२) नाही.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील प्रत्येक घरातील किमान एका तरी व्यक्तीचे बँक खाते उघडण्याची प्रक्रिया जिल्ह्यातील बँकांनी पूर्ण केली असून कोणाचे बँक खाते काही कारणांनी उघडावयाचे राहिले असेल तरी बँका अशी खाती उघडत आहेत. या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्व जिल्हे संपृक्त (saturated) झाल्याचे डिसेंबर, २०१४ मध्ये घोषित करण्यात आले आहे.

(३) नाही.

कोल्हापूर जिल्ह्यासाठी उपलब्ध असलेल्या खाली दिलेल्या आकडेवारीवरुन शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानापासून कोल्हापूर जिल्ह्यातील लाखो जण वंचित राहणार नाहीत.

(i) उघडली गेलेली खाती - ६,७९,१८४

(ii) या खात्यांमध्ये शिल्लक (रु.लाखात) - ८५४.०८

(iii) शून्य शिल्लक खाती - १,७५,५६४

(iv) रुपे कार्ड दिली गेलेली खाती - ५,६७,२०५

(v) आधार नोंदणी झालेली खाती - ४,६९,२६०

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यामध्ये मनरेगा अंतर्गत पिंपळशेत, दाभेरी, रुईघर, बोपदरी येथे झालेल्या कामांचा मोबदला मजुरांना अदा करण्याबाबत**

**(२) २५९७९ (१७-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यामध्ये मनरेगा अंतर्गत पिंपळशेत, दाभेरी, रुईघर, बोपदरी येथे झालेल्या कामांचा मोबदला मजुरांना अदा केला नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, मजूरांना मजुरी अदा न करणाऱ्या दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सुळेवाडी (ता. माळशिरस, जि.सोलापूर) येथील पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(३) ३४३९१ (१४-०१-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुळेवाडी (ता.माळशिरस, जि.सोलापुर) येथे पाझर तलावाच्या बांधकामासाठी श्री.राम शंकर सुळे व इतर शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १८९४ सालच्या भूसंपादन कायद्याखाली अधिकाऱ्यांनी सदरहू जमिनीचा मोबदला देण्यासाठी नोटीशी काढल्या होत्या परंतु अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) पाझर तलावाच्या भूसंपादन जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्यासाठी नवीन भूसंपादन कायद्याप्रमाणे दिनांक ५ मार्च, २०१५ रोजी विशेष भूसंपादन अधिकारी, क्र-१ सोलापूर यांनी अंतिम निवाडा जाहीर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन कायद्याप्रमाणे जमिनीची किंमत म्हणून बाजारभावाची चौपट रक्कम व जमीन ताब्यात घेतल्यापासून आतापर्यंत त्यावरील व्याजाची रक्कम यांचा अंतिम निवाडयामध्ये समावेश केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मोबदल्याची व्याजासह रक्कम त्या शेतकऱ्यांना कधी देण्यात येणार आहे व सदर रक्कम शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयकुमार रावल (०२-०८-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी नवीन भूसंपादन कायद्यातील तरतूदीनुसार दि.५ मार्च, २०१५ रोजी अंतीम निवाडा घोषित करण्यात आला आहे.

(४) या प्रकरणी दि.५ मार्च, २०१५ रोजी नवीन भूसंपादन कायद्यातील तरतूदीनुसार अंतीम निवाडा घोषित करण्यात आला.

आता या प्रकरणी महसूल व वन विभागाच्या दि.२६.५.२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार ग्रामीण भागासाठीचा गुणांक २ विचारात घेऊन जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सुधारित मुल्यांकन परिगणना तक्ता तयार केला आहे. जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडून सुधारित परिगणना तक्ता सादर करण्यात येत आहे.

(५) या प्रकरणी विभागीय आयुक्त, पुणे यांना दि.७.५.२०१६ च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयामार्फत प्रस्ताव सादर करण्याचे कळविले आहे. त्यानुसार प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## राज्यातील सिंचन शेतीयोग्य जमिनीवर न झाल्याने सिंचनाकरिता केलेल्या कामावरील निधी वाया गेल्याबाबत

**(४) ३६७२२ (१४-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतीयोग्य सिंचन न झाल्याने त्या जमिनीचा योग्य वापर झालेला नसल्याने तेथे सिंचनाकारीता केलेल्या कामावरील निधी वाया गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या जमिनीकडून पिक येणाच्या फारशा अपेक्षा नाहीत अशा जमीन सिंचनाखाली आणून जबरदस्तीने पिक घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा निष्कर्ष राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण विभागाच्या अभ्यासातून निघाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील पालशेत (ता.गुहागर) येथील सुपारी पिकाला पाणीपुरवठा करणा-या नदीतील गाळ काढण्याबाबत

**(५) ४०१८४ (०६-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयात सर्वाधिक सुपारी लागवड क्षेत्र (३५० हेक्टर) असलेल्या पालशेत (ता.गुहागर) येथील सुपारी पिकाला पाणीपुरवठा करणारी नदी झाडेझुडपे आणि गाळाने भरली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गाळामुळे पावसाळयात नदीचे पाणी दुतर्फा असलेल्या सुपारी बागायती व भातशेतीमध्ये जावून मोठया प्रमाणात नुकसान होते तर उन्हाळयात पाणीटंचाई निर्माण होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नदीतील गाळ काढण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :**(१) व (२) होय.
सरपंच ग्रामपंचायत पालशेत यांनी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडे महात्मा जलभूमी संधारण अभियानातून नदीपात्रातील गाळ, झाडेझुडपे काढण्यास परवानगी मिळणेबाबत दि.०४.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.
(३) सद्यस्थिती लोकसहभागातून पालशेत येथील नदीतील गाळ काढण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयाकरिता नाबार्डकडून तयार करण्यात आलेल्या वित्त आराखड्यातील तदतूदीबाबत

**(६) ४०३६४ (०५-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयाकरिता नाबार्डकडून २०१६ व २०१७ साठी २ हजार ४०० कोटी रुपयांचा वित्त आराखडा माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आराखडयात कोणकोणत्या कामाकरिता तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर आराखडयानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०८-२०१६) :**(१) होय.

रायगड जिल्हयाकरीता सन २०१६-१७ या वर्षासाठी नाबार्डकडून रु.२४००.०८ कोटी इतक्या रकमेचा वित्त आराखडा तयार करण्यात आला आहे.

(२) सदर वित्त आराखड्यामध्ये कृषी क्षेत्र व त्याअनुषंगीक बाबी, अन्न प्रक्रिया, कृषी विषयक पायाभूत सुविधा इत्यादींसाठी रक्कम रु. ६१५.५४ कोटी, सुक्ष्म, लघु, व मध्यम उद्योगांसाठी रक्कम रु.५२५.६४ कोटी आणि शिक्षण कर्ज, गृहनिर्माण कर्ज, क्रेडिट निर्यात, ऊर्जा पुनर्निर्मितीक्षम स्त्रोत इत्यादीसारख्या अन्य प्राधान्य क्षेत्रांसाठी रक्कम रु.१२५८.९० कोटी अशी एकुण २४००.०८ कोटी रक्कमेची तरतूद करण्यात आलेली आहे.

(३) जिल्हाधिकारी रायगड यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा स्तरीय सनियंत्रण व आढावा समितीच्या दि.१८.०३.२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात सिंचन विहिरींचे पंचनामे न करता सात बारावर नोंदी केल्याबाबत**

**(७) ४११३९ (०६-०५-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींच्या नोंदी तलाठ्यांनी पंचनामे केल्याशिवाय सात बारा उताऱ्यावर घेऊ नयेत असे आदेश जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सर्व संबंधितांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हदगाव तालुक्यातील ८५ विहिरी पूर्ण झाल्याची व त्या विहिरी सात बारा उताऱ्यावर घेतल्याचा अहवाल उपजिल्हाधिकारी रोजगार हमी योजना यांना तहसील कार्यालय हदगाव यांनी पाठविला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या विहिरींची नोंद सात बारा उताऱ्यावर करण्यापूर्वी तलाठ्यामार्फत पंचनामे करण्यात आले होते काय ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

तथापि, याबाबत प्राप्त झालेल्या निवेदनावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते.

(२) हदगाव तालुक्यात मग्रारोहयोअंतर्गत ७५ विहिरी पूर्ण झाल्या असून ३८ विहिरींची नोंद ७/१२ वर घेण्यात आली आहे. उर्वरित ३७ विहिरींची नोंद ७/१२ वर घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिराढोण उपसा सिंचन योजनेच्या उस्माननगर व शिराढोण वितरिकाच्या भू-संपादनाची रक्कम मिळण्याबाबत**

**(८) ४१६२९ (०५-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराढोण उपसा सिंचन योजनेच्या उस्माननगर व शिराढोण वितरिकाच्या भू-संपादनाची रक्कम त्वरित मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमत्र्यांना पत्रव्यवहार करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्यस्थितीमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे शेतक-यांना खरीप व रब्बी पिके घेता आली नाहीत त्यातच विभागाकडून उस्मानगनर वितरिका साखळी क्र १ ते ५ व शिराढोण वितरिका साखळी क्र ६ ते १० च्या कालव्याच्या कामाकरिता आवश्यक जमीन संपादित करुन कामे करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळी परिस्थितीचा विचार करता शेतक-यांना तातडीने जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०८-२०१६) :**(१) नाही.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयामार्फत शिराढोण उपसा सिंचन योजनेच्या भूसंपादनाकरीता रु.४०.९३ लक्ष निधी दिनांक २४/२/२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी (महसूल) कंधार यांना निवाडा रक्कम वाटपाकरीता उपलब्ध करुन दिलेला आहे.

(२) नाही.

सदरील वितरीकेची कामे करण्याकरीता नियमित भूसंपादन प्रस्ताव सादर केल्यानंतर व संबंधित शेतकऱ्यांनी स्वतःहून संमतीपत्र (परिशिष्ट-अ मध्ये) दिल्यानंतरच प्रत्यक्ष कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

(३) भूसंपादन निवाडा जाहीर करण्यात आलेला असून निधी उपलब्धतेनुसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळ, औरंगाबाद कार्यालयामार्फत शिराढोण उपसा सिंचन योजनेच्या भूसंपादनाकरीता दिनांक २४/२/२०१६ रोजी रु.४०.९३ लक्ष निधी उपविभागीय अधिकारी (महसूल), कंधार यांना उपलब्ध करुन दिलेला आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरीत रक्कम उपलब्ध करुन देणेत येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा नियोजन समितीने नेमलेल्या ठेकेदाराने केलेल्या संगणक गैरव्यवहाराबाबत**

**(९) ४१८३३ (०४-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा नियोजन समिती मार्फत लोकप्रतिनिधींच्या स्थानिक विकास निधीतून करण्यात आलेल्या संगणक वाटपामध्ये ठेकेदाराने गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) संबंधित ठेकेदाराने मागणी केलेल्या संगणकाच्या संख्येपेक्षा कमी संगणक वितरीत करून शाळा व शासनाची फसवणूक केल्याबाबत संबधित शाळांनी जिल्हाधिकारी यांचेसह लोकप्रतिनिधी यांचेकडे तक्रारी दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी ठेकेदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०१६) :**(१) नाही.

(२) होय.

(३) मा.आमदार महोदयांनी या संदर्भात जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडे चौकशीची मागणी केली होती. तथापि ठेकेदाराने संबंधित शाळांना संगणक पोहच झाल्याच्या पावत्या दाखविल्यानंतर आमदार महोदयांनी या संदर्भातील तक्रार मागे घेत असल्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दि.१४.५.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यात बनावट ठरावाद्वारे विहिरी मंजूरी केल्याबाबत**

**(१०) ४१९१० (०५-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा घाटंजी तालुका सन २०१४-१५ या वर्षात मुरली गावच्या ग्रामपंचायतीने सिंचन विहिरीसाठी २९ लाभार्थ्यांची निवड केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ मे, २०१५ रोजीची ग्रामसभा दाखवून बनावट ठरावाद्वारे विहिरी मंजूर केल्याची तक्रार विद्यमान सरपंच यांनी जिल्हा परिषदेचे सी.ई.ओ. कडे दाखल केल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-०८-२०१६) :**(१) होय, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत मुरली येथे मग्रारोहयो अंतर्गत ३० वैयक्तिक सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांना गट विकास अधिकारी पंचायत समिती घाटंजी यांच्यामार्फत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

(२) होय.

(३) होय, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता दि.१ मे, २०१५ रोजीची ग्रामसभा झाली असून सदर ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायत मुरली अंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. तसेच चौकशी अंती सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात वैयक्तिक सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रकरणी लाभार्थ्यांचे क्षेत्र जास्त असणे, लाभार्थ्याच्या शेतात विहिर अस्तित्वात असणे, लाभार्थी मयत असणे, शासन निर्णय दि.१० ऑक्टोबर, २००६ अन्वये निर्देशित केल्यानुसार लाभार्थ्यांची ग्रामसभेमधून निवड न होणे इ. कारणामुळे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात प्रशासकीय मान्यता प्राप्त ३० लाभार्थ्यांपैकी २७ लाभार्थी अपात्र आढळून आले व उर्वरित ३० लाभार्थी मग्रारोहयो अंतर्गत पात्र आढळून आले.

(४) चौकशीच्या अनुषंगाने दोषी तत्कालीन संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत मुरली, संबंधित ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत पंचायत मुरली, तत्कालीन तांत्रीक अधिकारी, पंचायत समिती घाटंजी व तत्कालीन रजा राखील ग्रामसेवक तथा मग्रारोहयो लिपिक, पंचायत समिती घाटंजी यांचेविरुध्द पोलिस स्टेशन घाटंजी येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित सहायक कार्यक्रम अधिकारी व गटा विकास अधिकारी पंचायत समिती घाटंजी यांचेविरुध्द मग्रारोहयो अधिनियम २००५ कलम २५ अन्वये रु.१०००/- ची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील करडी संग्राहक धरणाच्या स्वंयचलित दरवाज्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(११) ४२०७६ (३०-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील करडी संग्राहक धरणाच्या स्वंयचलित दरवाज्यांचा रबर पँकींगमधुन लाखो क्युसेस पाण्याचा विसर्ग होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाच्या दरवाजाची दुरुस्ती करण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०८-२०१६) :**(१) स्वयंचलीत द्‌वाराचे रबर सिल खराब झाल्यामुळे गेट मधुन काही प्रमाणात झिरपा झाल्याचे निदर्शनास आले होते.

(२) प्रस्तुत प्रकरणी दरवाज्याचे रबर सिल दुरुस्तीचे काम मार्च २०१६ ला पूर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्हयातील किलारी प्रकल्पग्रस्तांना एक रक्कमी अनुदान देण्याबाबत**

**(१२) ४२१५३ (२९-०४-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील एकाही किलारी प्रकल्पग्रस्तांना शासनाने निधी दिलेला नसल्याने त्यांना एक रकमी अनुदान देण्याबाबतची मागणी किलारी प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या वतीने मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार येथील प्रकल्पग्रस्तांना एक रकमी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :**(१) होय.

(२) (अ) १/८/२०१४ रोजी झालेल्या महाराष्ट्र व गोवा राज्याच्या मुख्यमंत्र्याच्या बैठकीतील निर्णयानुसार एकूण ९४७ प्रकल्पग्रस्तांना खास बाब म्हणून नोकरीऐवजी रु.५ लक्ष इतके एक रकमी अनुदान देण्याचा शासन निर्णय दि.१७/६/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. हा खर्च गोवा व महाराष्ट्र राज्याने अनुक्रमे ७३.३०:२६.७० या प्रमाणात करावयाचा आहे.

(ब) गोवा शासनाकडून थेट अदायगीसाठी सिंधुदूर्ग जिल्हा प्रशासनाने गोवा शासनास ४८४ पात्र खातेदारांची यादी सादर केली आहे.

(क) यापैकी १८ पात्र खातेदारांना (५ लक्ष x ०.७३३०) ३.६६५ लक्ष प्रति खातेदार इतकी अदायगी गोवा शासनाने थेट खातेदारांच्या बँक खात्यामध्ये जमा केलेली आहे.

(ड) गोवा शासनाच्या वित्त विभागाने उपरोक्त अदायगीतुन आयकर (At source TDS) कपात करणेसाठी खातेदारांचे पॅन कार्ड व नंबर इ. मागणी केली आहे. याबाबतची पुर्तता झालेनुसार त्यांना अदायगी प्रस्तावित आहे.

(इ) कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने महाराष्ट्र राज्याचा हिस्सा म्हणून पात्र ३७० खातेदारांचे रु.१.३३५ लक्ष (५ x ०.२६७) प्रति खातेदार यानुसार रु.४.९३ कोटी इतके अनुदान कार्यकारी अभियंता, तिलारी कालवा विभाग क्र. १, सावंतवाडी, यांचेकडे वर्ग केले आहे. तथापि तिलारी प्रकल्पग्रस्तांनी एकरकमी अनुदानामधून TDS वसूल करण्यात येऊ नये अशी मागणी केल्याने निधी वितरण करण्यात आलेले नाही. सदर बाब निकाली निघाल्यानंतर महसूल खात्याच्या समन्वयाने वितरण करण्यात येईल.

(ई) उर्वरित तिलारी प्रकल्पग्रस्तांना जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांनी पात्र ठरविल्यानंतर महाराष्ट्र राज्याचा हिस्स्याची अदायगी करणेसाठी महामंडळाने निधीची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**व्यापारी संघटनेची पॅनकार्ड सक्तीचे करण्याच्या मागणीबाबत**

**(१३) ४३४६७ (२५-०५-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जी.जे. एफ मुंबई यांच्या आदेशानुसार दोन लाखावरील खरेदीदारास पॅनकार्ड व फार्म नंबर ६० व ६१ सराफा ग्राहकाकडून भरुन घ्यावे असे आदेश देण्यात आले आहेत तथापि सहा वर्ष सदर रेकार्ड सांभाळणे कठीण असल्याने पॅनकार्ड सक्तीचे करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री व मा.वित्त मंत्री यांचेकडे व्यापारी संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०८-२०१६) :**(१) होय.

(२) संबंधित आदेश केंद्रिय प्रत्यक्ष कर बोर्ड, राजस्व विभाग, भारत सरकार यांच्यामार्फत निर्गमित केले असल्याने त्यावर राज्य शासनामार्फत कार्यवाही अपेक्षित नाही.

(३) लागू नाही.

---

**कराड (जि.सातारा) तालुक्यातील वाघेरी, मेरवेवाडी, पाचुंद व कामथी आदि गावांना टेंभू योजनेचे पाणी मिळण्याबाबत**

**(१४) ४३८२५ (३०-०४-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील वाघेरी, मेरवेवाडी पाचुंद व कामथी आदि गावांना टेंभू योजनेचे पाणी मिळण्याबाबतची मागणी मा.जलसंपदा राज्यमंत्री यांच्याकडे कराड येथील लोकप्रतिनिधीनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :**(१) होय.

(२) (अ) त्यानुषंगाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्याकडून याबाबतचा प्राथमिक अहवाल प्राप्त करुन घेतला आहे.

(ब) सदर मागणी केलेल्या कामाचा अंतर्भाव टेंभू उपसा सिंचन योजनेच्या प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवालामध्ये नाही. टेंभू योचजनेचे जलनियोजन व सिंचनक्षमता निश्चित झालेली आहे. प्रकल्पात आता अतिरिक्त पाणी शिल्लक नाही. वाघेरी (मेरवेवाडी) पाझर तलावाची क्षमता २१

दलघफू इतकी आहे. टेंभू योजनेच्या केंद्रीय जलआयोगाने मंजूर केलेल्या पाणी नियोजनामध्ये वाघेरी (मेरवेवाडी) पाझर तलावाचे पुनर्भरणासाठी आवश्यक पाण्याची तरतुद नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील गावांना लागणाऱ्या पाण्याचे नियोजन करण्याबाबत

**(१५) ४४२३८ (०३-०५-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील चिलेवाडी व पिंपळगांवजोगा धरण साठयातील पाणी स्थानिक लाभार्थी गावांना पिण्यासाठी व जनावरांचे चारा पिकांसाठी राखीव न ठेवता शासनातील काही अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात येडगांव धरणातून सोडून कुकडी कालव्याद्वारे विसापूर व पुढे करमाळा पारनेर भागात सोडण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जुन्नर तालुक्यातील गावांना पिण्यासाठी व चारा पिकविण्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे नियोजन न करता परस्पर सदर धरणातील पाणी कुकडी धरणात सोडण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, जुन्नर व पारनेर गावांना माहे जुन, २०१६ पर्यंत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०८-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) माहे जून-२०१६ पर्यंत पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने कुकडी प्रकल्पात माहे जानेवारी अखेर ८.६१५ टीएमसी पाणी शिल्लक आहे. जिल्हाधिकारी यांचे मागणी/नियोजनानुसार पाणी पुरवठा करणे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नगर जिल्हयातील मुळा, निळवंडे, भंडारदरा या तीनही धरणात पाणीसाठा कमी असल्यामुळे पाण्याचे नियोजन करण्याबाबत

**(१६) ४४९१८ (२१-०४-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर जिल्हयातील मुळा, निळवंडे, भंडारदरा या तीनही धरणात डिसेंबर, २०१४ मध्ये ७८ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक होता, यंदा माहे डिसेंबर, २०१५ मध्ये हाच उपयुक्त पाणीसाठा सरासरी ३६ टक्क्यांवर आला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुढील पावसाळयापर्यंत पिण्यासाठी व सिंचनासाठी काटकसरीचे नियोजन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :**(१) होय.

डिसेंबर, २०१४ मध्ये दिनांक ०१/१२/२०१४ रोजी मुळा धरणात उपयुक्त पाणीसाठा १५२९२ दलघफु(७१.१२%) होता. तसेच निळवंडे/भंडारदरा धरणात १५४६८ दलघफु (८६.२५%) व दिनांक ०१/१२/२०१५ रोजी मुळा धरणात ८४८० दलघफु (३९.४४%) व निळवंडे/भंडारदरा धरणात ६१६९ दलघफु (३४.४०%) उपयुक्त पाणीसाठा होता.

(२) महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्र.एस सी वाय/२०१५/प्र.क्र.२९०/अ-७/दि.०७/०९/२०१५ नुसार मुळा, निळवंडे व भंडारदरा धरणांमधील पाणीसाठा केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. सदर पाणी दि.३१/०७/२०१६ पर्यंत पुरविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण रस्त्याच्या वाढीव कामास निधी देण्याबाबत**

**(१७) ४५३९४ (२९-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण रस्त्यांना पुरेसा निधी देवून रस्त्याची कामे करण्याची मागणी सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार कोल्हापूर जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकुण लांबी ६५४१.२५ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ५२५०.७९ कि.मी. इतकी आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेस रस्ते व पूल, दुरूस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी एकूण रू.४१९६.६१ लक्ष, तेराव्या वित्त आयोगा अंतर्गत एकूण रू.६७१.९० लक्ष तर पूर हानी कार्यक्रमासाठी रु.८०४.७० लक्ष असा एकुण रू.५६७३.२१ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत. रस्त्यांच्या खराब लांबीतील दुरूस्तीची कामे जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून उपलब्ध निधी व निकषास अधिन राहून टप्प्या टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषद प्रयत्न करीत असते.

---

**अप्पर वैतरणा (जि.लातूर) धरणाची मजबूती करण्याबाबत**

**(१८) ४५८३५ (२९-०४-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील किल्लारी येथे झालेल्या भूकंपानंतर सन १९९३ मध्ये शासनाने राज्यातील धरणांच्या सुरक्षा तपासणीसाठी माजी सचित देऊसकर यांच्या नेतृत्वाखाली तज्ञ समिती नेमली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर वैतरणा धरणाची मजबूती करण्याबाबत या समितीने शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिफारशीनुसार या धरणाची मजबुतीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) व (४) अप्पर वैतरणा धरणाच्या मजबूतीकरणासाठी आवश्यक संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर चालू आहे.

---

**शेगाव (ता.जत, जि.सांगली) येथील साठवण तलावाचे काम करत असताना कंत्राटदाराने ब्रास कचरा तलावाच्या परीघामध्येच टाकल्याबाबत**

**(१९) ४५९१९ (०६-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव (ता.जत, जि.सांगली) येथील साठवण तलाव क्र. २ चे काम करत असताना कंत्राटदाराने २.५ हजार ते ३ हजार ब्रास कचरा तलावाच्या परीघामध्येच टाकला असल्याचे माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कचरा तलावात टाकल्याने तलावातील पाणी साठा वाढण्यास अडथळा होत असल्यामुळे स्थानिक नागरिकाने याबाबतची तक्रार करूनही कंत्राटदारावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावातील कचरा / गाळ काढण्याबाबत व तलावात गाळ टाकणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सदर कामाचे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यातयेत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०८-२०१६) :**(१) नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत अपंगाचे कल्याण व पुनर्वसन योजनेचा निधी अद्यापी खर्च करण्यात आलेला नसल्याबाबत**

**(२०) ४६०२१ (२८-०४-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत अपंगाचे कल्याण व पुनर्वसन योजना सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या दोन वर्षाचा रु.१६ लाख एवढा निधी अद्यापी खर्च करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापी निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या योजनेचा निधी खर्च न केल्याप्रकरणी चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :**(१) होय.
(२) खरेदीची प्रक्रिया ही ऑनलाईन असल्यामुळे खरेदी करण्याकरिताची प्रक्रीया तांत्रिक कारणामुळे पूर्ण होऊ न शकल्याने सन २०१५-१६ मध्ये निधी खर्च झाला नाही.
(३) शासन निर्णय दिनांक १७ जुलै, २०१५ व शासन निर्णय दिनांक ५ एप्रिल, २०१६ नुसार सदर निधी खर्च करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पैनगंगा नदीवरील कुरणी बंधाऱ्याचे दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२१) ४६३१२ (२५-०४-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पैनगंगा नदीवरील कुरणी बंधाऱ्याचे दुरूस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर धरणाचे दुरूस्तीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०८-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील मौजे देवाळा तुर्क पिंपरी येथील मग्रारोहयोजनेंतर्गत विहिरीला आक्षेप घेतल्याबाबत

**(२२) ४६३६५ (२८-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील मौजे देवाळा तुर्क पिंपरी येथील मग्रारोहयोजनेंतर्गत विहिरीला आक्षेप घेतले असून याबाबत चौकशी करण्यात यावी यासाठी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना स्थानिकांनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-०८-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
सदर प्रकरणी गट विकास अधिकारी, पं.स. औंढा यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे. शासन निर्णय दि.१७ डिसेंबर, २०१२ अन्वये विहित केलेल्या प्रवर्गाच्या प्राधन्यक्रमानुसार लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेने केली नसल्याचे आढळून आले आहे.
(३) सदर प्रकरणी दि.१७ डिसेंबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांची निवड करुन नव्याने प्रस्ताव सादर करणेबाबत गटविकास अधिकारी, पं.स. औंढा यांनी संबंधित ग्रामपंचायतीस आदेशित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील धरणांचे दुरुस्तीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२३) ४६७८३ (२५-०४-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील १) पुनाळ-तिरपण कासारी नदीसह धरण सोसायटी, पुनाळ १) कुंभी धामणी सहकारी धरण सोसायटी, कळे (३) कुंभी नदी सहकारी धरण संस्था, सांगरुळ या धरण संस्थांना शासनाकडून रु. ३३.२०/- लाख रुपये दुरुस्तीकरीता मंजूर झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा, करवीर कागल तालुक्यामध्ये शासनाची कोणतीही मदत न घेता स्थानिक शेतकऱ्यांनी स्वखर्चाने सन १९५३-५४ मध्ये कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थांना मंजूर आलेल्या अनुदानापैकी केवळ ५० टक्के रक्कम शासनाने संस्थानकडे वर्ग केल्याने धरणाचे दुरुस्तीचे काम अपूर्णावस्थेत राहील्याने दुष्काळी परीस्थितीमध्ये बंधाऱ्यांवरील शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्यासाठी भटकावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरित ५० टक्के रक्कम धरण दुरुस्तीला तात्काळ देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०८-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) होय, दिनांक १३/१०/२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये सदर मागणी करण्यात आलेली आहे. उर्वरीत ५० टक्के रक्कम सन २०१६-१७ मध्ये उपलब्ध करण्याचे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाडा (जि.अमरावती) येथील त्रिवेणी तलावाच्या मुख्य कालव्यातील झाडझुडपे काढण्याबाबत**

**(२४) ४७०२० (२८-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाडा (जि.अमरावती) येथील त्रिवेणी तलावाच्या मुख्य कालव्यात मोठया प्रमाणात गवत, झाडेझुडपे वाढल्याने एकीकडे पाणी तुंबून राहते तर दुसरीकडे कालव्याच्या मार्गात येणाऱ्या अनेक शेतांमध्ये पाणी घुसून नुकसान करीत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्यातील झाडझुडपे काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०८-२०१६) :**(१) अंशत: खरे.
पावसाळा २०१५ नंतरच्या कालावधीत मुख्य कालव्यात गवत झाडे झुडपे वाढलेली होती परंतु कालव्याबाहेर पाणी जाऊन शेतामध्ये घुसून शेतकऱ्यांचे नुकसान झालेले नाही.
(२) माहे जानेवारी २०१६ मध्ये कालव्यातील झाडे झुडपे, गवत इत्यादी काढण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यात रोहयो व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेची अपूर्णावस्थेत असलेली कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२५) ४७७३४ (०४-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यात रोहयो व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेची कामे अपूर्णावस्थेत असल्याचे मा. ग्रामविकास राज्यमंत्री यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजना अपूर्णावस्थेत ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच या योजना तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०६-०९-२०१६) :**(१) व (२) रोजगार हमी योजनेंतर्गत जळगांव जिल्ह्यात सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात ५९३७ इतकी कामे सुरु असून त्यापैकी ७७८ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

सन २०१६-१७ मध्ये रोहयो अंतर्गत २७७४ कामे सुरु आहेत. त्यापैकी ८५ कामे पूर्ण झालेली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत ६३३ योजना कार्यान्वित असून त्यापैकी २२ पाणी पुरवठा योजनेतील ३० टक्के कामे अपूर्ण आहेत. तेथील ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना सदर कामे तात्काळ पूर्ण करुन योजनेचे अंतिम देयक सादर करण्यासाठी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
(३) अपूर्ण योजनांच्या कामांची अंदाजपत्रके तयार करुन त्यास मंजूरी घेवून सदर योजना पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघ इटियाडोह सिंचन विभाग, गोंदिया लघु कालव्याचा प्रकल्प, मुंडीपार, लटोरी, मायनर, (ता.सालेकसा) येथील प्रकल्पग्रस्तांना मोबदला मिळण्याबाबत**

**(२६) ४८११८ (३०-०४-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघ इटियाडोह सिंचन विभाग, गोंदिया लघु कालव्याचा प्रकल्प, मुंडीपार, लटोरी, मायनर, (ता.सालेकसा) येथील सन १९९५ मध्ये कामे पूर्ण झाले परंतु प्रकल्पग्रस्तांना अद्यापपर्यंत मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाग्रस्तांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०८-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

बाघ प्रकल्पाअंतर्गत मुंडीपार-लटोरी मायनर ता.सालेकसा जि. गोंदिया चे कालव्याकरीता मौजा असईटोला मधील ०.४३ हे. आर व मौजा लटोरी मधील १.३३ हे.आर. अशी एकुण १.७६ हे. आर. जमीन संपादीत करण्यात आलेली आहे. या मायनरचे बांधकाम सन २००० मध्ये पूर्ण झालेले आहे.

(२) मौजा असईटोला व मौजा लटोरी या दोन भुसंपादन प्रकरणाकरीता स्वतंत्र भूसंपादन प्रस्ताव विशेष भुअर्जन अधिकारी, देवरी यांना सादर करण्यात आलेले आहेत. मौजा लटोरी प्रकरणी अंतिम निवाडा पारीत झालेला असून रोहयो अंतर्गत काम झालेले असल्याने जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे स्तरावर निधीची मागणी करण्यात आलेली आहे. मौजा असईटोला प्रकरणी नविन भूसंपादन कायदा २०१३ नुसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील तिवसा पंचायत समिती व नगरपंचायतील शेतकऱ्यांच्या खचलेल्या विहिरींचे बांधकाम करण्याबाबत**

**(२७) ४८१४३ (३०-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील तिवसा पंचायत समितीला व नगरपंचायतील शेतकऱ्यांच्या खचलेल्या विहिरींचे बांधकाम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खचलेल्या विहिरीच्या पुनर्बांधणीसाठी अनुदानावर आधारित योजना आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या खचलेल्या विहिरींचे पुनर्बांधणीसाठी अनुदान देऊन तातडीने विहिरीचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-०९-२०१६)** :(१) हे अंशत: खरे आहे.

तिवसा नगर पंचायत क्षेत्रात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना लागु नाही. परंतु उर्वरित तालुक्यातील गावांमध्ये खचलेल्या विहीरींची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१४/प्र.क्र.२५/मग्रारो-१/ दि.२० जुलै, २०१५ नुसार खचलेल्या विहीरीच्या दुरुस्ती करिता कमाल रक्कम रु.१,५०,०००/- इतकी अनुज्ञेय आहे. लाभार्थ्यांस प्रत्यक्ष रक्कम न देता मजुराची मजुरी व कुशल खर्च शासनातर्फे करण्यात येतो.

(३) सद्यस्थितीत तिवसा तालुक्यात नगर पंचायत, तिवसा वगळता उर्वरित तालुक्यामध्ये एकूण ५१२ खचलेल्या विहीरीच्या दुरुस्तीच्या कामांना तहसिलदार, तिवसा यांच्याकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. प्रशासकीय मंजूरी दिल्या पैकी २१५ विहीरींची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील गुरुकुंज उपसा सिंचन प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२८) ४८३८८ (२५-०४-२०१६). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यात एकमवे गुरुकुंज उपसा सिंचन प्रकल्प सन २००७-०८ साली मंजूर झाला असून मंजूर झालेल्या पहिल्या टप्प्यातील शीर्ष कामाची चार वर्षाची मुदत संपली असून सुध्दा या प्रकल्पाचे काम फक्त कागदावरच असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प प्रलंबीत असल्यामुळे प्रकल्पाची लाभार्थी असलेली १७ हजार एकर जमीन पाण्याअभावी कोरडी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०८-२०१६)** :(१) नाही, उपसा सिंचन योजनेसाठी आवश्यक उर्ध्व गामी नलिकेचे ६० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम सुरु आहे. तसेच पंपगृह इतर भागाचे सविस्तर संकल्पने तयार करण्याचे काम मध्यवर्ती संकल्पीत संघटना, नाशिक यांचे मार्फत सुरु आहे.

(२) होय, तथापी, वर नमूद केलेनुसार योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) सद्य:स्थितीत उर्ध्वगामी नलिकेचे काम प्रगतीत आहे. वितरण प्रणालीसह जून, १८ पर्यंत योजनेचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा वार्षिक नियोजन रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत वितरीत निधीतील मंजूर कामाची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) ४८४५९ (०४-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक नियोजन रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१४ -१५ व त्या पूर्वीच्या वर्षातील निधीतील मंजूर कामांचा निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांनी सदर कामावर खर्च न करता इतर योजनेच्या कामावर खर्च केल्यामुळे सदर निधीतील मंजूर कामाची देयके प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर कामाच्या निधीतील कामाची व सदर कामाची देयके वितरणाच्या अनियमिततेची व गैरव्यवहाराची चौकशी करून संबधित दोषीवर कारवाई करण्याची मागणी लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०९-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) ते (५) या संदर्भात जिल्हाधिकारी, लातूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०११-१२ ते २०१४-१५ अंतर्गत रस्ते विषयक योजनेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीपैकी अखर्चीत राहिलेला निधी जिल्हा नियोजन समितीला प्रत्यार्पित न करता राज्य योजनेच्या अन्य लेखाशिर्षा खालील कामांची देयके अदा करण्यासाठी परस्पर वापरण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या अनियमिततेबाबत संबंधितांचा खुलासा मागवून जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे.

---

**बुलडाणा जिल्हयातील मानव विकास निर्देशांक वाढविण्याबाबत**

**(३०) ४८६२६ (०६-०५-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचा सरासरी मानव विकास निर्देशांक हा ०.७५२ असुन बुलडाणा जिल्हयातील मानव विकास निर्देशांक मध्यम स्तरावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलडाणा जिल्हयाचा सरासरी मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी सुविधा यांचा अनुषेश भरुन काढणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, मानव विकास निर्देशांक वाढविण्या करीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०१६)** :(१), (२) व (३) महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२ नुसार महाराष्ट्र राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.७५२ असून बुलडाणा जिल्ह्याचा निर्देशांक ०.६८४ असा आहे.

राज्यातील मागास जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक उंचावण्याकरीता मानव विकासावर आधारित योजना राबविण्याच्या दृष्टीने शासन निर्णय क्रमांक :- माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का-१४१८, दि.१९ जुलै, २०११ निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार शिक्षण, आरोग्य व उत्पन्नवाढ या विकास क्षेत्रातील योजना राबविण्यात येत आहेत.

या व्यतिरिक्त मानव विकास निर्देशांक उंचावण्याच्या दृष्टीने जिल्हा/तालुक्यांची भौगोलिक, आर्थिक तसेच सामाजिक परिस्थिती विचारात घेऊन जिल्हा/तालुका स्पेसिफिक योजना राबविण्यास अनुमती देण्यात आलेली आहे.

मानव विकास कार्यक्रमासाठी सन २०१६-१७ मध्ये सर्वसाधारण योजनेअंतर्गत रु.३००.०० कोटी व अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत रु.२.०० कोटी असा एकुण रु.३०२.०० कोटी निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. त्यापैकी बुलढाणा जिल्हाला दि.१३.४.२०१६ व दि.१३.५.२०१६ च्या निधी वितरण आदेशान्वये सर्वसासाधारण योजनेअंतर्गत रु.२६९.५० लाख व रु.७००.०० लाख असा एकुण रु.९६९.५० लाख निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत रु.१.८२ लाख व रु.६.५१ लाख असा एकुण रु.८.३३ लाख निधी वितरित करण्यात आला आहे.

---

## कोल्हापूर जिल्हयामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अधिनियमांचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३१) ४८८११ (२५-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१२-१३ पासून चालू असलेल्या कामांची शासन निर्णय दिनांक २७ सप्टेंबर, २०१२ अन्वये मापदंडाप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील उपअभियंता यांनी तपासणी केलेल्या कामांमध्ये मनरेगा अधिनियमांचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील मागील दोन वर्षामध्ये नरेगा अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील शाखा अभियंता (उप अभियंता पदभार) यांनी तपासणी केलेल्या कामांमध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे सदर कामांची चौकशी करण्याकरीता वेळोवेळी समिती नेमण्यात आली. चौकशी

समितीचा अहवाल प्राप्त झाला असून, काही कामात अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.
(३) चौकशी समितीच्या अहवालानुसार अनियमितता व गैरव्यवहार झालेल्या प्रकरणी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील सिंचन प्रकल्पाच्या भुसंपादनाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३२) ४९०६३ (०४-०५-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हातील सिंचन प्रकल्पाच्या भुसंपादनासाठी आवश्यक असलेल्या ३३३.१६ कोटीच्या मागणीवर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाची कार्यवाही पूर्ण होऊन निधी वितरीत करण्यात आला आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी अंतर्गत भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०८-२०१६) :**(१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे भूसंपादनासाठी रु.६३५.८५ कोटीची मागणी जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कडून प्राप्त झाली होती. त्यापैकी रु.४४०.१५ कोटी इतका निधी संबंधीत विभागास उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. उर्वरीत निधी सन २०१६-१७ चे तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या निधीमधुन उपलब्ध करुन देण्यात येईल.
(२) भूसंपादनाची कार्यवाही अंशत: पूर्ण झाली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे बंद असल्याबाबत**

**(३३) ४९१७७ (३०-०४-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे बंद झाल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागात कर्मचाऱ्यांची संख्या अपूरी असल्याने तहसिलच्या आवारातील सदर विभागाचे कार्यालय कर्मचाऱ्याअभावी बहुताश वेळा बंद असते तसेच तालुक्यातून विविध कामांचे प्रस्ताव आलेले असतानांही त्यावर कोणताच निर्णय होत नसल्याने कामे बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-०८-२०१६)** :(१) व (२) हे खरे नाही.

तहसिल व पंचायत समिती मधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना विभागात आवश्यक पुरेश्या कंत्राटी कर्मचारी यांच्या नेमणूका करण्यात आल्या असून, हे कंत्राटी कर्मचारी सद्या कार्यरत आहेत.

या व्यतिरिक्त तहसिलमध्ये १ अव्वल कारकून व पंचायत समितीमध्ये १ सहाय्यक लेखाधिकारी हे नियमित कर्मचारीही योजनेचे काम करत आहेत. त्यामुळे सदर विभागात कमचाऱ्यांची संख्या अपुरी आहे व कर्मचाऱ्यांअभावी बहुतांश वेळा हा विभाग बंद राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सिंदखेड राजा तालुक्यात माहे डिसेंबर, २०१५ मध्ये दि.९/१२/२०१५ अखेर सप्ताहात एकूण ६० कामे प्रगतीपथावर होती, तसेच मजूर उपस्थिती २५७२ होती. त्यामुळे कामे नसल्याने मंजूरावर बेरोजगारीची वेळ आल्याची बाब खरी नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) तालुक्यात सामाजिक वनीकरणाच्या दुर्लक्षामुळे लाखो रुपयाचे नुकसान झाल्याबाबत

**(३४) ४९१८१ (३०-०४-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) ताका सामाजिक वनीकरण यांच्याकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून रस्त्यालगत लावण्यात आलेले एक हजार रोपाचे वृक्षारोपण नियोजनाअभावी अर्ध्याअधिक झाडे सूकली असून वाळवी लागली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक वनीकरणाच्या दुर्लक्षामुळे शासनाचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-०८-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत जकाती अभावी होणारे नुकसान टाळण्यासाठी**
**नवीन कर लावण्याचा घेतलेला निर्णयाबाबत**

**(३५) ४९२२६ (०७-०५-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत जकाती अभावी होणारे नुकसान टाळण्यासाठी शासनाने नवीन कर लावण्याचा निर्णय माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, तसेच जनतेवर कराचा भार पडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) लागू नाही.
(३) लागू नाही.
(४) लागू नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील धरणे पूर्ण भरलेली नसतानाही तेथील धरणातील पाणी**
**मराठवाड्यातील जायकवाडी धरणाला देण्यात येत असल्याबाबत**

**(३६) ४९७३८ (०३-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात पाऊस कमी झाल्याने मुळा धरण व भंडारदरा धरण निम्मेच भरलेले असताना मराठवाड्यातील जायकवाडी धरणाला पाणी दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारदरा, मुळा, निळवंड ही धरणे मराठवाड्यातील जायकवाडी धरणाच्या पूर्वी तयार करण्यात आली या जुन्या धरणाला काही लोकप्रतिनिधी बेकायदेशीर ठरवित आहेत तरी याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०८-२०१६)** :(१) नाही.

दि.१५/१०/२०१५ रोजी मुळा धरणात ३१४.७३ दलघमी (५१.७%) व भंडारदरा धरणात २०२.७० दलघमी (६६.६२%) पाणी साठा आहे. गोदावरी खोऱ्यातील समन्यायी पाणी वाटपासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरण, मुंबई व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशानुसार जायकवाडीच्या उर्ध्व भागातील धरणसमुहामधुन जायकवाडीसाठी पाणी सोडण्याची कार्यवाही झाली आहे. तसेच उर्वरित पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आलेला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात शेतक-यांनी रोजगार हमी योजनेंतर्गत खोदलेल्या सिंचन विहिरींची थकित देयके अदा करण्याबाबत**

**(३७) ५००९१ (०४-०५-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात शेतक-यांनी रोजगार हमी योजनेंतर्गत खोदलेल्या सिंचन विहिरींची थकित देयके २ वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर विहिरींची थकित देयके तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१६)** :(१), (२) व (३) घनसावंगी तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०११-१२ ते २०१३-१४ या वर्षातील सिंचन विहिरींची अकुशल व कुशल देयकाची अनुक्रमे रु.४१.५ लाख व रु.१३९.७५ लाख इतकी रक्कम प्रलंबित होती. त्यापैकी कुशल देयकाची रक्कम रु.९९.५३ लाख शासन परिपत्रक दिनांक २६ मे, २०१५ व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जालना यांचे दिनांक ६ जून, २०१५ चे पत्र तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचे दिनांक १६ जून, २०१५ च्या पत्रान्वये अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित प्रलंबित रकमेपैकी अकुशल देयकाची रक्कम रु.४१.५० लाख व कुशल देयकाची रक्कम रु.४०.२२ लाख जिल्हाधिकारी, जालना यांच्या दिनांक २० एप्रिल, २०१६ च्या आदेशानुसार वाटप करण्यात आली असून प्रलंबित सर्व देयके अदा करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मध्य चांदा विभागांतर्गत (जि.चंद्रपूर) कन्हाळगाव परिक्षेत्रातील**
**बाबूंची बेकायदेशीर वृक्षतोड केल्याबाबत**

**(३८) ५०१९३ (०७-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य चांदा विभागांतर्गत (जि.चंद्रपूर) कन्हाळगाव परिक्षेत्रात कक्ष क्र. १३१ मध्ये बांबूची तोड करीत असताना त्या भागातील इतरही क्षेत्रातील बाबूंची बेकायदेशीर वृक्षतोड केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार वन विभागातील संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०८-२०१६) :**(१) सन २०१५-१६ मध्ये कन्हारगांव परिक्षेत्रांतर्गत ९ कक्षामध्ये एकूण १२९०.०० हे. क्षेत्रात बांबू निष्कासनाने काम मंजूर झालेले होते. मंजूर आराखड्यातील कक्ष क्र. १३१ मध्ये कटाई करणारे मजूरांनी नजरचुकीने कक्ष क्र. १३९ मधील सुमारे ३.६२३ हे. क्षेत्रातील १६,५३१ बांबू कटाई केली सदर तोड करण्यात आलेले बांबू विक्री आगार, कान्हारगांव येथे पाठविण्यात आले आहे.

(२) व (३) बांबू निष्कासन कामाच्या ज्या १७ मजूरांकडून नजरचूकीने बांबू कटाई झाली, त्यांच्याकडून प्रत्येकी रु. ५०० प्रमाणे एकूण रु. ८५००/- दंड वसूल करण्यात आलेले आहे. तसेच, सदर प्रकरणी कु.पी.एन.लालसरे, वनरक्षक व श्री.पी.एस.वडगांवकर (प्रभारी वनपाल) हे दोषी आढळल्याने, त्यांना निलंबीत केले आणि वनपरिक्षेत्र अधिकारी, कन्हारगांव यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे भूसंपादनाचे ३२२ कोटी पेक्षा**
**अधिक रक्कम शासनाकडे थकीत असल्याबाबत**

**(३९) ५०५२३ (०६-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या पंधरा वर्षापासून मराठवाड्यात गोदावरी खोरे महामंडळांतर्गत करण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये मराठवाड्यातील जवळपास २६ हजार शेतकऱ्यांचे संपादित जमिनीचा ३२२ कोटी पेक्षा अधिकचा मोबदला शेतकऱ्यांना देणे थकीत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी आजतागायत किती जमीन संपादित करण्यात आली असून किती मोबदला सदर जमीन संपादनपोटी देण्यात आलेला आहे तसेच किती मावेजा देणे प्रलंबित आहे,

(४) असल्यास, सदर संपादित जमिनीचा प्रलंबित मोबदला संबधित शेतकऱ्यांना त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०८-२०१६) :**(१) होय.
(२) निधी उपलब्धतेनुसार मोबदला अदा करण्यात येत आहे.
(३) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद अंतर्गत प्रकल्पांसाठी एकूण ४१६३७.३२ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आलेले असून मूळ निवाड्यापोटी एकूण रु.९१७.४६ कोटी मोबदला अदा करण्यात आलेला असून रु.७५५.७९ कोटी मावेजा देणे प्रलंबित आहे.
(४) भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रलंबित मोबदला शेतकऱ्यांना अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदपूर व चाकुर (जि.लातुर) तालुक्यात विविध योजनांचे/महामंडळाचे कर्ज वाटप करण्यामध्ये संबंधित यंत्रणेकडून विलंब होत असल्याबाबत

**(४०) ५०८०६ (२७-०४-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर व चाकुर (जि.लातुर) तालुक्यात विविध योजनांचे/महामंडळाचे कर्ज वाटप करण्यामध्ये संबंधित यंत्रणेकडून प्रचंड विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्ज वाटप करावे यासंदर्भात वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयापुढे आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अहमदपुर येथील स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखेच्या मार्फत कर्ज मंजुर होवून सुद्धा तब्बल एक ते दीड वर्षापासून संबंधित लाभार्थ्यांना कर्ज रकमेचे वाटप करण्यास बँकेकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर विविध आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून नागरीकांना उद्योग व्यवसायाला कर्ज पुरवठा वाढीव स्वरुपात करण्याचे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, दुष्काळी परिस्थितीमुळे सर्व महामंडळाचे मागील कर्ज माफ करण्याचे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०८-२०१६) :**(१) राज्य सार्वजनिक उपक्रम /महामंडळांपैकी काही महामंडळामार्फत शासनाच्या विविध योजना राबविण्यात येत असून या योजनांतर्गत राज्यातील विविध प्रवर्गातील व्यक्तींना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते. अशा

उपक्रमांपैकी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनातंर्गत लातूर जिल्ह्यातील अहमदपूर व चाकुर या तालुक्यातील काही कर्ज वाटप प्रकरणांमध्ये विलंब झाला होता. हे खरे आहे.

(२) व (३) साहिन्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या कर्ज योजनांमध्ये कर्ज मंजूरी व वितरण यास शासनाने दि.२/१२/२०१४ रोजी स्थगिती दिली होती. ही स्थगिती उठविण्यासंदर्भात आंदोलन झाले हे खरे आहे. सदर स्थगिती शासनाने दि.१/३/२०१६ रोजी उठविली असून प्रलंबित प्रकरणांतील निधी वितरित करण्यात आलेला असल्याचे सदर महामंडळाने कळविले आहे.

तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाकडे सन २०१५-२०१६ या वर्षात प्राप्त झालेल्या एकूण ७ प्रकरणांपैकी वीज कर्ज योजनेंतर्गत ५ प्रकरणांचे कर्जवाटप करण्यात आलेले आहे आणि अनुदान योजनेतंर्गत २ प्रकरणे बँकेकडे प्रलंबित आहेत.

(४) व (५) नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर कामांना निधी देण्याबाबत**

**(४१) ५११२४ (०६-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजना सन २०१४-१५ रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर कामे पूर्ण होऊनही सदर कामाची देयके निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांच्याकडे निधी नसल्याने प्रलंबित आहेत व सदर देयके देण्याबाबत संबधित एजन्सीने मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत किती निधींची कामे मंजूर करण्यात आली होती व त्यासाठी जिल्हाधिकारी लातूर यांनी किती निधी वितरीत केला आहे,

(३) असल्यास, सदर मंजूर कामांचा निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०९-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), सन २०१४-१५ अंतर्गत रस्ते विकासाच्या ५६ कामांसाठी रु.७८६.२७ लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, लातूर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर या कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत केला होता.

(३) व (४) जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१४-१५ अंतर्गत रस्ते विषयक योजनेच्या ५६ कामांसाठी वितरीत केलेला रु.७८६.२७ लक्ष निधी सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षात सदर कामांसाठी खर्च होणार नसल्याने

तो जिल्हा नियोजन समितीला प्रत्यार्पित न करता कार्यान्वयन यंत्रणेने सन २०१३-१४ मधील व त्यापूर्वीच्या जिल्हा वार्षिक योजनेतील व अन्य योजनांमधील रस्त्यांच्या कामांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी वापरल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब ही अनियमितता असल्याचे आढळून येत असल्याने त्याबाबत संबंधित प्रशासकिय विभाग म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संबंधितांकडून खुलासा मागवून जबाबदारी निश्चित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच सन २०१४-१५ मध्ये जिल्हा नियोजन समितीने वितरत केलेला निधी अखर्चीत राहणार असल्यास तो प्रत्यार्पित न केल्याने सदर कामांसाठी पुन्हा जिल्हा वार्षिक योजनेतून निधी देय होत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील महागाव पंचायत समितीने धडक सिंचन योजनेअंतर्गत बांधलेल्या विहीरीच्या कामात झालेला गैरकारभार**

**(४२) ५१८२७ (३०-०४-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती महागांव (जि.यवतमाळ) अंतर्गत धडक सिंचन योजने अंतर्गत बांधलेल्या विहीरी पात्र लाभार्थी व नियमानुसार स्थळ पाहणी न करता गैरकारभार करुन बांधण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) महागाव पंचायत समिती अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत खचलेल्या विहीरीचे लाभार्थी निवडतांना खचलेल्या विहीरी सोडून पक्या बांधकाम केलेल्या जुन्या विहीरीचे अंदाजपत्रक तयार केल्यामुळे कृषी विभागाने त्यामधील काही विहीरी रद्दद करण्याची शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील अडगावसह सोळा गावांना बहुळा धरणातून पाणी सोडण्याबाबत**

**(४३) ५१८५६ (३०-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील अडगावसह सोळा गावाचा पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्याबाबत बहुळा धरणातून अडगावसह सोळा गावासाठी पाणी सोडण्याची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे

स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :**(१) होय.

(२) दिनांक १२/०२/२०१६ पासून बहुळा धरणातून पाणी सोडण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भरणे बंधाऱ्याच्या (ता.खेड, जि. रत्नागिरी) पुनर्बांधणीसाठीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) ५२२८२ (०६-०५-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भरणे बंधाऱ्याच्या (ता.खेड, जि.रत्नागिरी) पुनर्बांधणीसाठी जलसंपदा विभागाकडून १ कोटी ७५ हजार रुपये खर्चाच्या कामास प्रशासकीय मंजूरी मिळाली असतानाही हा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्याचा पाया पोखरत चालला असून हा पाया कधीही कोसळण्याची शक्यता असल्यामुळे नजिकच्या तीन गावातील पाणी योजनेला धोका पोहचून पाणी टंचाई निर्माण होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंधाऱ्याची पुनर्बांधणी वेळेत झाली असती तर नजीकच्या गांवाचा पाणीप्रश्न मिटून त्यांना बारमाही पिके घेणे शक्य झाले असते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

भरणे बंधारा नादुरुस्त झाला असून या प्रकल्पावर अवलंबून गावांना नातूवाडी मध्यम प्रकल्पातून पाणी उपलब्ध करुन दिले जात असल्याने पाणीटंचाई निर्माण होत नाही. तसेच मागणी प्रमाणे सदर बंधाऱ्यातून सिंचनासाठी पाणी देण्यात येत आहे.

(४) अंदाजपत्रकास दि.१७/०२/२०१६ अन्वये रु.१७९.६५ लक्ष रक्कमेस तांत्रिक मान्यता प्रदान केली असून निविदा प्रक्रियेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील खडकपुर्णा धरणाची उंची न वाढविण्याबाबत**

**(४५) ५२७७२ (०६-०५-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील खडकपुर्णा धरणाची उंची वाढविण्यात येवू नये अशी वेळोवेळी जनतेकडून मागणी होत असून देखील उंची वाढविण्याची प्रक्रिया करित असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०८-२०१६) :**(१) नाही.

(२) खडकपूर्णा धरणाची उंची एक फुटाने वाढविणेबाबत लोकप्रतिनिधींची मागणी आहे. त्याअनुषंगाने पाणी उपलब्धता तसेच पाणीसाठा वाढल्यामुळे होणाऱ्या परिमाणांचा अभ्यास करण्यात येत आहे. सर्वकष अभ्यासाअंतीच यथायोग्य निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हयात पांदण रस्त्यासाठी नियोजित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४६) ५३१६४ (२९-०४-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयात पांदण रस्ते मोठ्या प्रमाणात करण्यासाठी ४ कोटी रुपयाचा निधी देण्याचे आश्वासन मा.वित्त मंत्री महोदयांनी दिल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.वित्त मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार वर्धा जिल्हयात पांदण रस्त्यासाठी नियोजित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०६-०९-२०१६) :**(१) निधी देण्याचे आश्वासन देण्यात आलेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अपुऱ्या व अत्यल्प पावसामुळे दुष्काळ पडलेल्या भागातील नागरिक बेरोजगार असताना रोजगार हमीची कामे हाती घेण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(४७) ५३२२९ (१६-०५-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपुऱ्या व अत्यल्प पावसामुळे दुष्काळ पडलेल्या भागातील नागरिक बेरोजगार झाल्याने मोठ्या प्रमाणावर रोजगार हमीची कामे हाती घेण्यास विलंब होत असल्यामुळे नागरिक शहराकडे वळत असल्याची बाब माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांचे स्वरूप काय आहे व दुष्काळी भागातील नागरिकांना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कामे राबवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने सर्व जिल्ह्यांना जास्तीत जास्त कामे शेल्फवर ठेऊन मंजूराची कामाची मागणी आल्यास तात्काळ कामे उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. राज्यात माहे मार्च, २०१६ मध्ये ३,८२,०७९ कामे विविध टप्प्यांवर सुरु होती. तसेच ४,२०,४७२ इतकी कामे शेल्फवर उपलब्ध होती.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेने पाटबंधारे विभागास द्यावयाच्या पाणीपट्टीच्या थकबाकीबाबत**

**(४८) ५३२४८ (०६-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेने पाठबंधारे विभागाचे पाणीपट्टी थकबाकी पोटी रु.१३ कोटी ३० लाख इतकी देणी देणे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकबाकी दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर न भरल्यास पाणी कनेक्शन तोडण्याची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे, महानगरपालिकेस अशा स्वरुपाची नोटीस देण्यात आली होती.

(३) कोल्हापूर महानगरपालिकेला थकीत पाणीपट्टी भरण्याबाबत वारंवार नोटीस दिल्या असून थकीम रक्कमेपोटी प्रचलित दराने विलंब शुल्क आकारण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड येथील देव्हारे-कुडुक-उमरोली इ.जि.मा.या रस्त्याचे काम नाबार्ड अंतर्गत मंजूर करण्याबाबत**

**(४९) ६१६४४ (०७-०७-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड येथील देव्हारे-कुडुक-उमरोली इ.जि.मा. या रस्त्याचे काम नाबार्ड अंतर्गत मंजूर करण्याबाबत येथील स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक १४ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्राद्वारे विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासाठी अंदाजे १ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून हा रस्ता झाल्यास नागरिकांना सोईचे होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०८-२०१६) :**(१) व (२) असे पत्र प्राप्त झाले आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अंदाजे रु.२५६.२० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

(३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ६४४१.११ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु.३३३२.१० लक्ष, तेरावा वित्त आयोगाअंतर्गत सन २०१२-२०१३ ते २०१४-२०१५ अतर्गत रु.७२८.५१ लक्ष इतर पुरहानी कार्यक्रमांतर्गत सन २०१३-१४ लक्ष तर पुरहानी कार्यक्रमांतर्गत सन २०१३-१४ मध्ये रत्नागिरी जिल्हा परिषदेस रु.१७००.६३ लक्ष असा एकूण रु.५७६१.२४ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या ०/०० ते ९/०० कि.मी. या खराब लांबीचे डांबरीनुतनीकरणाचे काम सन २०१६-१७ च्या जिल्हा वार्षिक योजना आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील मंडणगड येथील देव्हारे -वडवली-आतले शेवरे-चिंचघर इ.जि.मा.या रस्त्याचे काम नाबार्ड अंतर्गत मंजूर करण्याबाबत

**(५०) ६१६४५ (१५-०७-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मंडणगड येथील देव्हारे -वडवली-आतले शेवरे-चिंचघर इ.जि.मा.या रस्त्याचे काम नाबार्ड अंतर्गत मंजूर करण्याबाबत येथील स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक १४ जून, २०१६ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्राद्वारे विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासाठी अंदाजे १ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून हा रस्ता झाल्यास नागरिकांना सोईचे होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०८-२०१६) :**(१) व (२) होय, असे पत्र मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे प्राप्त झाले आहे.

(३) प्रश्नांकित प्र.रा.मा. १५ ते देव्हारे वडवली आतले शेवरे चिंचघर हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार इतर जिल्हा मार्ग क्र. १० दर्जाचा असून त्याची एकूण लांबी १२.०० कि.मी. आहे.

सन २०१५-१६ मध्ये २० टक्के जि.प.सेस अनुदानातून ५/५०० ते ८/६०० कि.मी. लांबीतील खडीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. पंचायत समिती सेस अनुदानातून ३/६०० ते ३/८९० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत खराब लांबीतील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सन २०१६-१७ संभाव्य जिल्हा वार्षिक योजना आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रश्नांकित रस्त्याचे काम टप्प्या-टप्प्याने घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.